**मार्गदर्शक सुचना**
**जिल्हा मासिक चर्चासत्र**

जा.क्र./कृमावि/विप्र-४/जिमाच/११२४७/२०२०
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
दि. १८/०३/२०२०

**प्रति,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक,(सर्व) -------------विभाग------**

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,(सर्व) ----------------**

**३. प्रकल्प संचालक (आत्मा) ,(सर्व) ----------------**

**विषय - जिल्हा मासिक चर्चासत्र सन २०२०-२१ मार्गदर्शक सुचना ....**

**प्रस्तावना-** राज्यातील शेतक-यांच्या उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता कृषि व कृषि संलग्न क्षेत्रात विस्तार कार्याचे प्राधान्य नेहमीच अधोरेखित होते. कृषि विद्यापीठांमधील संशोधित अद्यावत कृषि तंत्रज्ञान तसेच प्रयोगशील शेतकरी बांधवाकडुन केले जाणारे नाविन्यपुर्ण प्रयोग ग्रामपातळीवर सर्व शेतक-यांच्या शेतापर्यंत पोहचविणे हे कृषि खात्याचे मुलभुत विस्तार कार्य आहे. जिल्हास्तरीय अधिका-यांपासून ग्रामपातळीवरील कृषि सहायकापर्यंत प्रत्येक घटकावर याचे उत्तरदायित्व येते.

कृषि विदयापीठातील संशोधनाचा शेतक-यांपर्यंत प्रसार व्हावा तसेच विदयापीठातील शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत पिक परिस्थितीची पाहणी करून त्वरीत रोग व किडनियंत्रणाबाबत संदेश निर्मिती करून कृषि विभागाच्या माध्यमातून संदेशांचे प्रसारण करणे तसेच वेळोवेळी उद्‌भवणारे पिकावरील किड रोग व तद्‌अनुषंगिक समस्यांचे निराकरण करणेकरीता जिल्हा मासिक चर्चासत्र उत्तम व्यासपीठ आहे. त्याकरीता जिल्हा मासिक चर्चासत्र कार्यक्रम राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये माहे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येतो.

**उद्देश-**

१) कृषि विद्यापीठातील संशोधनाचा शेतक-यांपर्यंत प्रसार करणे.
२) कृषि विभाग, कृषि विद्यापीठ व कृषि संलग्न इतर विभाग यांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन जिल्ह्यातील प्रमुख पिकांच्या पीक परिस्थितीची पाहणी करणे
३) पिक परिस्थितीची पाहणी करून पिक व्यवस्थापन, कृषि संलग्न व्यवसाय, रोग व किडनियंत्रणाबाबत संदेश निर्मिती व प्रसारण करणे तसेच भविष्यात उद्‌भवणा-या परिस्थितीबाबत सावधतेची पुर्वसुचना देणे.
४) जिल्ह्यातील पीक परिस्थिती, विद्यापीठातील नविन संशोधीत तंत्रज्ञान यावर चर्चा करणे.
५) नाविण्यपुर्ण उपक्रम, नवीन तंत्रज्ञान यावर आधारीत प्रकल्पांना भेटी आयोजित करणे.
६) आपत्कालीन परिस्थितीत शेतक-यांना विद्यापीठाचे संशोधक व कृषि विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचे कडुन प्रत्यक्ष मार्गदर्शन करुन त्यांचे शंका समाधान करणे.
७) शेतक-यांचे शेतीविषयक प्रश्न कृषि विद्यापीठापर्यंत व विद्यापीठातील तंत्रज्ञान शेतक-यांसाठी पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे.
८) शेतकरी-शास्त्रज्ञ यांचा प्रत्यक्ष समन्वय साधून शेतक-यांच्या शेती व शेतीपुरक व्यवसाय विषयक विविध प्रश्नांची सोडवणुक करणे.
९) कृषि संबंधीत केंद्रीय आणि राज्य शासनाच्या संशोधन संस्था, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र,यांचेमार्फत होणारे संशोधन शेतक-यांपर्यंत पोहोचविणे.

**स्वरुप-** शेतक-याच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन शिवार फेरीत आढळुन आलेल्या पिकांबाबतच्या विविध समस्या उदा. कीड रोग परिस्थिती, विविध वाण, जमिन आरोग्य पत्रिका,हवामान व पर्जन्यमान आणि तंत्रज्ञान अवलंबन

यासारख्या विस्तार विषयक बाबीवर चर्चा तथा मार्गदर्शन करुन त्याबाबतचे संदेश देणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये कृषि विभाग, कृषि विद्यापीठ व कृषि संलग्न इतर विभाग या सर्व विभागांच्या प्रतिनिधींच्या एकत्र सहभागातून दोन दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात येते. त्यामध्ये जिल्ह्यातील पिक परिस्थितीचा एक दिवसीय संयुक्त पाहणी दौरा (प्रक्षेत्र भेट) करुन नियोजित वेळापत्रकानुसार दुसरे दिवशी चर्चासत्र आयोजित केले जाते.

**पहिला दिवस- अ) पहीले सत्र -प्रक्षेत्र भेट-** जिल्हा मासिक चर्चासत्रातील पहिल्या दिवशी म्हणजेच प्रक्षेत्र भेटीमध्ये खालील अभियान/ योजना/ उपक्रम/ बाबींना भेटीचे आयोजन करण्यात यावे

- नियोजित वेळापत्रकानुसार नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणारे शेतकरी/शेतकरी गट/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी यांचे शिवारावर एक दिवसीय संयुक्त पाहणी दौरा प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करावे. या भेटीमध्ये समस्याग्रस्त क्षेत्राशी संबंधीत शेतांचाही अंतर्भाव असावा.
- विस्तार विषयक अभियान/ योजना/ उपक्रम/प्रकल्प तसेच राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, फलोत्पादन, बाबींना भेटीचे आयोजन करण्यात यावे.
- शेतकरी उत्पादक कंपन्यांचे उपक्रम
- नविन तंत्रज्ञान आधारीत प्रकल्प व प्रक्रिया युनिट
- पीक कापणी प्रयोगाचे प्लॉट.
- स्वयंचलित हवामान केंद्र.
- प्रमुख पिकांचे रोग व किडग्रस्त /समस्याग्रस्त प्लॉट.
- कृषि संलग्न/पुरक व्यवसायाशी निगडीत प्रकल्प/उद्योग
- कृषि बचत गटांचे प्रकल्प

**ब) दुसरे सत्र -** दूस-या सत्रात दिलेल्या भेटींच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा करून प्राप्त समस्या/ प्रत्याभरण यांचे निराकरण करणे व जर सदरचा प्रश्न/प्रत्याभरण यांचे त्वरीत निराकरण होवू शकत नसेल तर त्वरीत दूस-या दिवशीच्या प्रथम सत्रात संबंधित विषयांच्या विषय विशेषज्ञ यांचे मार्गदर्शनाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / विस्तार कृषि विदयावेत्ता यांचे स्तरावरून नियोजन करावे.

**दुसरा दिवस-**

- क्षेत्रिय भेटींचा परामर्श व मागील चर्चासत्राचे इतिवृत्त कायम करणे.
- तालुका कृषि अधिकारी यांनी खालील नमुद मुद्द्यांच्या अनुषंगाने सादरीकरण करावे.

१. हवामान व पर्जन्यमान (सर्कलनिहाय)
२. पेरणी अहवाल व पिक परिस्थिती—पिकनिहाय तृणधान्य, कडधान्य,तेलबिया, नगदी पीके, चारा, भाजीपाला, फुलपिके, फळपिके इत्यादी.
३. मृद चाचणी व जमीन आरोग्य पत्रिका
४. किड रोग प्रादुर्भाव व उपाययोजना/व्यवस्थापन -(सर्वेक्षण,सल्ला, अवलंबन)
५. विविध योजनांतर्गत विस्तार कार्य - प्रशिक्षण/प्रात्यक्षिके/शेतीशाळा
६. नाविण्यपुर्ण उपक्रम /यशोगाथा
७. विद्यापीठ चाचणी प्रयोग, आद्यरेषीय पिक प्रात्यक्षिके
८. विविध अभियानाअंतर्गत आयोजित पीक प्रात्यक्षिके
९. कृषि विद्यापीठांच्या शिफारशींवर आधारीत तंत्रज्ञानाचे अवलंबन
१०. पीक स्पर्धा आयोजन
११. पीक कापणी प्रयोगाचे आयोजन, निष्कर्ष व यंत्रणानिहाय आढावा

१२. सुधारीत तंत्रज्ञानाचे अवलंब करण्यामध्ये येत असलेल्या समस्यांबाबत शेतक-यांचे अभिप्राय व चर्चा
१३. कृषि संलग्न विभागाशी निगडीत प्रात्यक्षिके, योजना व अभियान
१४. महाबीज, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास मंडळ, पणन महामंडळ व इतर कृषि संलग्न विभाग योजना
१५. कृषि संलग्न विभागांचे योजना/उपक्रम/अभियान - पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, रेशीम उद्योग,मत्स्यव्यवसाय, मधुमक्षीका पालन इ.
१६. स्थानिक पुढाकाराच्या बाबी

- निदान चमुच्या क्षेत्रिय भेटींवरील निरिक्षणे व चर्चा
- प्रत्याभरण समस्या (Feed Back)
- विभागीय संशोधन आणि विस्तार सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारशींबाबत मासिक चर्चासत्रात विस्तृत चर्चा व्हावी.
- संलग्न विभागाचे जिल्हा स्तरावरील अधिकारी यांचे सहभागाने/समन्वयाने केंद्र पुरस्कृत, राज्य पुरस्कृत, विविध अभियाने, विविध योजना, आपत्कालीन परिस्थितीत शेतक-यांनी स्वतः राबविलेले तंत्रज्ञान यांचे सादरीकरण व चर्चा करावी.
- सादरीकरण करणा-या सर्व संबंधीत अधिका-यांनी सादरीकरण अहवालाच्या प्रती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि विस्तार कृषि विद्यावेत्ता यांना देणे आवश्यक आहे.
- उपस्थित शेतक-यांना त्यांचे अनुभव कथनास, चर्चेस पुरेसा वेळ द्यावा. आवश्यकतेनुसार विषय विशेषज्ञांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करावे.
- सदर दिवशी चर्चासत्रात निव्वळ योजनांचा आढावा न घेता तांत्रिक चर्चा आणि मार्गदर्शनावर केंद्रीकरण करावे.
- जिल्हास्तरीय निदान चमुची (Diagnostic Team) स्थापना - हवामान बदल तसेच अचानक उद्‌भवणा-या किड रोग प्रादुर्भावामुळे पिकांवर होणा-या परिणामाबाबतची निरिक्षणे वेळीच राज्यास अवगत करणे हे निदान चमुचे कार्य आहे. निदान चमुमध्ये जिल्हास्तरीय कृषि व कृषि संलग्न विभागांचे अधिकारी तसेच कृषि विद्यापीठ आणि कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ असतील.
- कृषि संलग्न विभागाच्या स्तरावरून जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या व कृषि उत्पन्न उपबाजार समिती स्तरावरील प्रमुख शेतमालांची आवक व बाजारभाव, तालुकानिहाय व मुख्य गावनिहाय कृषि सेवा केंद्रांच्या स्तरावरील उपलब्ध निविष्ठांचा अहवाल (बियाणे/ खते) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी उपलब्ध करून त्यावर चर्चा करण्यात यावी.

**उपरोक्त सर्व मुद्दे आणि चर्चासत्राच्या दोन दिवसामधील झालेली चर्चा, घेतलेले निर्णय,सुचविलेल्या उपाययोजना इत्यादींचा समावेश असलेले सर्वंकष इतिवृत्त जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि विस्तार कृषि विद्यावेत्ता यांनी समन्वयाने तयार करावे. सदरचे इतिवृत्त सर्व संबंधीतांना आठ दिवसाचे आत पोहोच होण्याचे दृष्टीने कार्यवाही व्हावी.**

**सहभाग –** कृषि विदयापीठांचे व कृषि विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ यांनी जिल्हा मासिक चर्चासत्रास उपस्थित राहणे आवश्यक आहे. सर्व संबंधीतांनी चर्चासत्रास उपस्थित राहणेबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संपर्क करावा. जेणेकरून शेतक-यांच्या अडीअडचणीबाबत चर्चा होणे शक्य होईल.

कृषि व कृषि संलग्न योजना/तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचविणेकरीता चर्चासत्रामध्ये खालील विभागाचे अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित राहणे अत्यावश्यक आहे.

- **कृषि विभाग** - जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ते मंडळ कृषि अधिकारी स्तरापर्यतचे अधिकारी
- **कृषि विभाग आत्मा यंत्रणा**

- **कृषि विद्यापीठ-**

  अ) विस्तार कृषि विद्यावेत्ता

  ब) कृषि विस्तार शाखा

  क) उद्यानविद्या शाखा

  ड) पिक संरक्षण (कृषि किटक शास्त्रज्ञ,वनस्पती रोगशास्त्रज्ञ)

  इ) किड रोग संरक्षण व सल्ला प्रकल्प प्रतिनिधी

  ई)फळपिक किडरोग सर्व्हेक्षण व सल्ला प्रकल्प प्रतिनिधी

  उ) कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ/विषय विशेषज्ञ

  ऊ) कृषि विषयक राष्ट्रीय संशोधन केंद्र/संस्था

- **कृषि संलग्न विभाग**

  १. पशुसंवर्धन विभाग

  २. दुग्धव्यवसाय विभाग

  ३. रेशीम उद्योग विभाग

  ४. मत्स्यव्यवसाय विभाग

  ५. मधुमक्षिकापालन विभाग

- **जिल्हा परिषद, कृषि विभाग**

- **इतर विभाग/महामंडळ**

  १. आदिवासी विकास विभाग

  २. ग्रामिण विकास यंत्रणा

  ३. जलसंपदा विभाग

  ४. सामाजिक वनीकरण विभाग

  ५. वनविभाग

  ६. लघुसिंचन विभाग

  ७. कृषि पणन मंडळ

  ८. वखार महामंडळ

  ९. महाबीज

  १०. मार्कफेड

  ११. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास मंडळ, यासारख्या संलग्न संस्थेचे प्रतिनिधी

  **१२. कृषिपूरक बाबींच्या अनुषंगाने इतर शासकीय/निमशासकीय विभागाचे प्रतिनिधी**

- **शेतकरी**

  १) विविध पुरस्कार प्राप्त किमान एक तज्ञ शेतकरी

  २) नाविण्यपुर्ण उपक्रम राबविणारे प्रगतशील शेतकरी

  ३) शेतीमध्ये देशी तंत्रज्ञान (ITK) विकसीत केलेले तज्ञ शेतकरी/ कारागीर/ त्रयस्थ व्यक्ती तसेच कृषि किंवा अन्य विभागातील क्षेत्रीय स्तरावर काम करणारे परंतु नविन तंत्रज्ञान राबविणारे क्षेत्रीय कर्मचारी यांनीही सदर चर्चासत्रास उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सदर तंत्रज्ञानाची नोंद घेवून ते विकसित करण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे.

- आवश्यकतेनुसार इतर शासकीय/निमशासकीय विभागाच्या प्रतिनिधींना निमंत्रित करावे.

**चर्चासत्र आयोजनाचे स्थळ –**

- कृषि विदयापीठांचे संशोधन केंद्रे, कृषि महाविद्यालय, कृषि विज्ञान केंद्रे, अपवादात्मक परिस्थितीत निमशासकीय व खाजगी संशोधन केंद्रे इत्यादी ठिकाणी चर्चासत्राचे आयोजन करावे.
- अपरिहार्य परिस्थितीत कृषि चिकित्सालये/ रोपवाटीका/ तालुका बिज गुणन केंद्रे येथे आयोजित करावीत.
- जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात किमान वर्षातून एकदा जिल्हा मासिक चर्चासत्राच्या प्रक्षेत्र भेटीचे आयोजन होईल हे पहावे.
- एखादया नविन तंत्रज्ञानाची निकड/ओळख, कृषि संशोधन केंद्रावर चाललेले संशोधन, शेतक-यांच्या शेतावर राबवित असलेले तंत्रज्ञान, पिक काढणोत्तर तंत्रज्ञान उदा.साठवणूक, कृषि प्रक्रिया किंवा तत्सम बाबींच्या अनुषंगाने जिल्हयात किंवा जिल्हयाच्या बाहेर गरजेनुसार जिल्हा मासिक चर्चासत्र आयोजित करावे.

**नियोजन -**

- माहे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीतील मासिक जिल्हा चर्चासत्र आयोजनाचे वेळापत्रक माहे नोव्हेंबर महिन्यातील चर्चासत्रात मान्यता घेऊन अंतिम करण्यात यावे.
- संबंधित विभागांना जिल्हा मासिक चर्चासत्राच्या वेळापत्रकानुसार आपले विभागाचे कामाचे नियोजन करणेच्या दृष्टिने सदरचे वेळापत्रक डिसेंबरमध्ये पाठविण्यात यावे.
- जिल्हा मासिक चर्चासत्र आयोजनाची सर्व जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी समन्वयक म्हणून काम पाहावे.
- पुढील महिन्याच्या मासिक चर्चासत्राच्या अनुषंगाने कृषि क्षेत्रासमोरील आव्हाने, आवश्यक तांत्रिक दृष्टिकोनातून अधिकारी व शास्त्रज्ञ यांची गरज, क्षेत्रीय भेटींच्या अनुषंगाने चर्चासत्राच्या ठिकाणांची निश्चिती व नियोजन याबाबत विस्तृत चर्चा व आयोजकांच्या स्तरावरून नियोजन करावे.

**सर्वसाधारण सुचना**

- जिल्हयातील तालुका बिज गुणन केंद्र व शासकीय रोपवाटिका, कृषि विदयापीठाचे संशोधन केंद्रांची प्रक्षेत्रे, तज्ञ शेतक-यांच्या शेतावर, वेळप्रसंगी निमशासकीय, खाजगी संस्थांच्या/शेतक-यांच्या प्रक्षेत्रावर चाचणी वजा प्रात्यक्षिके, कृषि विद्यापीठ चाचणी प्रयोग, आद्यरेषीय चाचणी प्रयोग इत्यादी ठिकाणी आयोजित करण्याबाबत चर्चा व नियोजन करणे. सदरचे आयोजन व सनियंत्रणाची जबाबदारी निश्चित करणे, यामध्ये जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची सर्वस्वी जबाबदारी राहील.
- खरीप,रब्बी व उन्हाळी हंगामाचे दृष्टीकोनातून जिल्ह्याचे सविस्तर पिक नियोजन करावे.
- गरजेनुसार आपत्कालीन पिक आराखडा तयार करून त्यामध्ये सुधारणा कराव्यात.
- विभागीय संशोधन आणि विस्तार सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारशी अंतर्भूत असलेली पुस्तिका जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावरून सर्व तालुका स्तरावर देणे अपेक्षित आहे. जेणेकरून तालुकास्तरीय अधिकाय-यांना संदर्भ व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सहज शक्य होईल.
- जिल्हयातील तज्ञ शेतकरी/कारागीर/ त्रयस्थ व्यक्ती यांनी विकसीत केलेले देशी तंत्रज्ञान (ITK) याबाबत विस्तृत चर्चा करून संशोधन केंद्रावर त्याची चाचणी घेण्याच्या दृष्टिने नियोजन करणे.
- जिल्हयातील शेतीविषयक प्राधान्याच्या प्रश्नाबाबत अधिकारी/ शास्त्रज्ञ / विषय विशेषज्ञ/ तज्ञ शेतकरी व्याख्यान आयोजित करणे.
- जिल्हा मासिक चर्चासत्र अधिक कार्यक्षम होणेसाठी मोठया प्रमाणावर माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करावा. वास्तविक प्रत्याभरण व कृषि विषयक समस्यांची माहिती व तंत्रज्ञानाव्दारे त्वरित निराकरण होईल हे पहावे.
- **तंत्रज्ञान अवलंबन व प्रत्याभरणाबाबत वेळोवेळी कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञांना अवगत करावे.तसेच विभागीय संशोधन व सल्लागार समितीच्या हंगामनिहाय बैठकीचे वेळी याबाबत स्वतंत्र अहवाल सादर करण्यात यावा.**
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावरून जिल्हयात आयोजित केलेल्या मासिक चर्चासत्रामध्ये आढळून आलेल्या नाविन्यपूर्ण बाबी, देशी तंत्रज्ञान, विभागीय संशोधन आणि सल्लागार परिषदेने केलेल्या

शिफारशींच्या अनुषंगाने घेतलेल्या चाचण्या अशा निवडक बाबी संग्रहीत करून जिल्हयांची संपदा म्हणून दरवर्षी पुस्तिका प्रकाशित करावी.

**कृषि संदेश निर्मिती व प्रसारण –**

- जिल्हयातील प्रमुख पिकांचा सखोल आढावा, हवामान व पिक परिस्थिती ,पीक संरक्षण, प्राप्त प्रत्याभरण, कृषि संलग्न विभागांच्या बाबी इत्यादी विचारात घेवून कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञ, विस्तार कृषि विदयावेत्ता यांनी तयार /सादर केलेल्या मासिक कृषि संदेशावर चर्चासत्राच्या दुसरे दिवशी विस्तृत चर्चा करून संदेश अंतिम करावेत.
- सदर मासिक कृषि संदेश कृषि सहायकामार्फत गांवपातळीवरील वार्ताफलकावर प्रदर्शित करण्यात यावेत.
- कृषि संदेशास तात्काळ स्थानिक वर्तमानपत्रे, आकाशवाणी, इतर माध्यमांद्वारे विनामुल्य व्यापक प्रसिद्धी द्यावी.
- कृषि संदेश जास्तीत जास्त शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी शेतक-यांचे मोबाईलवर ग्रुप तयार करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या (उदा. व्हाटस्ॲप) माध्यमातून अधिका-यांनी संदेशांचा प्रचार /प्रसार करावा.

**संनियंत्रण-**

- विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागातील जिल्हा मासिक चर्चासत्रांचे सनियंत्रण करावे.
- प्रत्येक महिन्याला विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे विभागातील चर्चासत्रास उपस्थित राहून मार्गदर्शन करावे. जेणेकरून जिल्हा मासिक चर्चासत्राचे सनियंत्रण चांगल्या प्रकारे होवून चर्चासत्राचा हेतू सफल होण्यास मदत होईल.
- विभागीय कृषि सहसंचालक यांचे कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि उपसंचालक (सांख्यिकी)/ तंत्र अधिकारी विस्तार यांनी सुद्धा चर्चासत्रास उपस्थित राहावे.
- कृषि आयुक्तालय स्तरावर संचालक/कृषि सहसंचालक /उपसंचालक यांनी सुद्धा जिल्हा मासिक चर्चासत्रांना उपस्थित राहावे. संबंधित विभागातील ज्वलंत प्रश्न, विभागातील समस्या/प्रत्याभरण/राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या अनुषंगाने चर्चासत्राच्या चमूमध्ये सर्वंकष चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**आर्थिक तरतूद** – मासिक चर्चासत्र संदेश निर्मीती व प्रसारणापोटी होणारा खर्च जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावर विविध योजनांतर्गत संकीर्ण बाबीकरीता उपलब्ध तरतूदीमधून विहीत लेखापद्धतीचा अवलंब करुन खर्च करण्यात यावा.

**अहवाल- मासिक चर्चासत्राचे नियोजन तसेच चर्चासत्रामध्ये निश्चित करण्यात आलेल्या कृषि संदेशाची एक प्रत व चर्चासत्राचे इतिवृत्त सात दिवसाच्या आत कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय,पुणे या कार्यासनास नियमितपणे सादर करण्याची दक्षता घ्यावी.**

(सदर मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या **www.krishi.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत-** मा.अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
**प्रत-** माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
/- आपले अधिनस्त जिल्हास्तरीय क्षेत्रिय अधिका-यांना जिल्हा मासिक चर्चासत्रास नियमितपणे उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरुन सूचना देणेस विनंती आहे.

१. मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,पुणे

२. मा.आयुक्त (पशुसंवर्धन ),पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे

३. मा.आयुक्त ( दुग्धव्यवसाय), दुग्धव्यवसाय आयुक्तालय,मुंबई

४. मा.आयुक्त (मत्स्यव्यवसाय),मत्स्यव्यवसाय आयुक्तालय, मुंबई

५. कृषि संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

६. कार्यकारी संचालक (पणन), पणन महामंडळ, पुणे

७. संचालक,(रेशीम) संचालनालय,नागपुर

८. संचालक,(मधुमक्षिकापालन),वनाधारीत उद्योग, मुंबई.

९. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

१०. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर

११. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद

१२. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,कोपरी ,(पूर्व ) ठाणे

१३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे

१४.संचालक, विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

१५.संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

१६.संचालक, विस्तार शिक्षण, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली

१७.संचालक, विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी

१८. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, (सर्व)

१९. कृषि विकास अधिकारी, (सर्व)

२०. कृषि उपसंचालक, आयुक्त (कृषि), कक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव.